श्री. आरिफ शाह, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची डॉ. पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन मधील कृषि उपसंचालक, प्रकल्प व्यवस्थापन युनीट या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि १४१९/प्र.क्र.१४१/१५अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई -३२.
तारीख: १९ जुलै, २०१९

शासन निर्णय :-

श्री. आरिफ शाह, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीने, डॉ. पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन, अकोला मधील कृषि उपसंचालक, प्रकल्प व्यवस्थापन युनीट या पदावर, प्रतिनियुक्तीने नियुक्ती, खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-

अ) श्री. आरिफ शाह, ज्या तारखेला शासकीय सेवेतील पदाचा कार्यभार सुपूर्द करतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला श्री. शाह, आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्वीकारतील, त्या तारखेला समाप्त होईल.

आ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीणे शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

इ) जर त्यांची सेवा प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन, अकोला यांना आवश्यक वाटली नाही तर श्री. शाह यांना मुळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा त्यांना राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी त्यांनी शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ई) श्री. शाह यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी ३ महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. श्री. शाह यांनी प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि) , महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१९१६३१३३१००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.07.19 16:36:15 +05'30'

(सु. सं. धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कुलगुरू, डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
३. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
५. प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन युनिट, अकोला.
६. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
७. संबंधीत विभागीय कृषि सह संचालक (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
८. कृषि सह संचालक, आस्थापना, कृषि आयुक्तालय, पुणे
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१०. संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
११. निवड नस्ती /१५अे

प्रतिलिपी,

१२. मा.मंत्री (कृषि) / मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. मा. सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.